**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उद्योग मंत्री** : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा किंवा कर्मचाऱ्यांच्या नोकरीस महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम, २०११ कलम (२) च्या खंड (क) उप खंड (६) मधील तरतुदीनुसार अत्यावश्यक सेवा म्हणून जाहीर केल्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्र. आयडीसी-२०१५/ प्र.क्र.२६७ (एक)/ उद्योग १४ दिनांकित १८ ऑक्टोबर, २०१६ सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सामाजिक न्याय मंत्री** : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा व उपकंपनी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ यांचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा "चौदावा" व "पंधरावा" अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : औचित्याचे मुद्दे.**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु चर्चा न झालेली लक्षवेधी सूचना क्र.१)**

(१) **सर्वश्री. हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यासाठी स्थापन झालेल्या वसई उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची भाईंदर ते तलासरीपर्यंत असलेली हद्द, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा व तलासरी हे संपुर्णत: आदिवासीबहुल तालुके ठाणे परिवहन कार्यालयाशी संलग्न ठेवल्याने नागरिकांना १५० ते २०० कि.मी. चे अंतर पार करुन ठाणे येथील परिवहन कार्यालयात जाऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांना सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड, विरार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय हे मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असल्याने येथे येणे-जाणे खुप सोईचे असून वसई उप प्रादेशिक **(RTO)** परिवहन कार्यालय विरार परिवहन कार्यालयाशी संलग्न करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे निवेदनाव्दारे मागणी करुनही त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, वसई उप प्रादेशिक परिवहन कार्यालय हे विरार परिवहन कार्यालयाशी संलग्न करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री.सुधीर पारवे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील विशेषत: पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी इंदीरा सागर गोसिखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाचे करण्यात आलेले नियोजन, सदर प्रकल्पाकरीता नागपूर व भंडारा जिल्ह्यातील एकुण ८५ गावे प्रकल्पामुळे विस्थापित होणे, यापैकी नागपूर जिल्ह्यातील ५१ गावांचे ३४ पर्यायी गावठाणात टप्पानिहाय पुनर्वसनाची सुरु असलेली कार्यवाही, पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधांची प्रकल्पाच्या ५ टक्के निधीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात आलेली कामे अपुर्ण व दर्जाहीन असणे. विस्थापित गावे विस्तारित गावठाणात पुनर्वसीत झाल्याने अपुऱ्या पडणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना खडीकरणाचे रस्ते पुर्णपणे उध्वस्त होणे, त्या रस्त्यांची गरजेनुसार डांबरीकरण किंवा सिमेंटीकरण करण्याची आवश्यकता, नाल्या व मोरींचे नव्याने करावयाचे बांधकाम, काही इमारती निर्लेखीत करुन नव्याने बांधणे, प्रत्येक गावठाणात थ्री-फेज विद्युत पुरवठा उपलब्ध करणे, माता बाल संगोपन केंद्र बांधणे, पुनर्वसन गावठाणातुन शेतीकडे जाणारे रस्ते बांधणे, दुसऱ्या-

तिसऱ्या टप्प्यातील गावांना जोडणारे बारमाही रस्ते दुरुस्त करणे, गावठाणात असलेली स्मशान भूमी गावाबाहेर हलविणे, पुनर्वसन गावठाणापासून लांब अंतरावर शिल्लक असलेल्या शेतीचे संपादन करण्याची होत असलेली मागणी, जुन्या गावठाणात भाड्याने, नातेवाईकांच्या आश्रयाने किंवा रोजगारासाठी येवून ३० ते ३५ वर्षापासून स्थायी वास्तव्यास असलेले प्रकल्पग्रस्त ज्यांची नावे प्रकल्पग्रस्तांच्या यादीत नाहीत अशा पुनर्वसन गावठाणात भूखंड उपलब्ध करणे, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, अस्लम शेख, सदा सरवणकर, सुनिल शिंदे, सुनिल प्रभु, प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, नारायण पाटील, ॲड.राहुल कुल, श्री.अबु आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात इयत्ता आठवीपर्यंत पुढच्या वर्गात ढकलण्यात आलेले विद्यार्थी इयत्ता नववीत गेल्यानंतर अनुत्तीर्ण होणे, राज्यातील शाळा, विद्यार्थी संख्या, शिक्षक यांची युडाएस या प्रणालीकडून करण्यात आलेल्या पहाणीत माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये नववीत अडीच लाख मुले अनुत्तीर्ण झाल्याची बाब उघडकीस येणे, तर दहावी नंतर लाखो विद्यार्थी शिक्षणापासून दूर गेल्याचे उघडकीस येणे, उच्च शिक्षणापर्यंत पोहचणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण विभागाकडून होत असलेल्या प्रयत्नांना आलेले अपयश, शिक्षणातील वाढत चाललेल्या गळतीचे वास्तव्य यूडाएसच्या (युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्यूकेशन) माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द झालेल्या आकडेवारी वरुन स्पष्ट होणे, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात दहावीच्या वर्गात असलेल्या १७ लाख २७ हजार ५५९ विद्यार्थ्यांपैकी ११ लाख ७० हजार विद्यार्थ्यांनी ११ वीच्या वर्गात प्रवेश घेणे, ७० हजार ४०५ विद्यार्थी अभियांत्रिकी तर १ लाख १३ हजार विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तसेच १० हजार ६४३ शेतकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन शिकत असले तरी दोन लाख ३९ हजार विद्यार्थी हे दहावीला उत्तीर्ण होऊनही त्यांनी अकरावीला कुठेही प्रवेश घेतला नसल्याची बाब उघडकीस येणे, याप्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री.नारायण पाटील, डी.एस.अहिरे, प्रा.विरेंद्र जगताप, ॲड यशोमती ठाकूर, श्री.अबु आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात किमान आधारभूत किंमतीत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेली लाखो क्विंटल ज्वारी वर्ष होऊनही त्याचे वितरण न झाल्यामुळे गोदामामध्ये सडत पडलेली असणे, एकट्या नंदुरबार जिल्ह्यात सुमारे **२०** हजार क्विंटल ज्वारी एक वर्षाहून अधिक कालावधीपासून गोदामामध्ये पडून असणे, ज्वारीला कीड आणि जाळी लागलेल्या असून त्यातून पीठही पडत असणे, शासन या धान्याविषयी कोणताच निर्णय घेत नसल्याने हे धान्य फेकून देण्याची निर्माण झालेली परिस्थीती, राज्यात अनेक तालुक्यातील ज्वारी ही वखार महामंडळाच्या गोदामात असल्याने या ज्वारीच्या भाड्यासाठी शासनाला लाखो रुपये भाड्यापोटी द्यावे लागणे, गोदामात वर्षभरापासून ठेवलेली ज्वारी आणि इतर धान्याच्या फवारणीसाठी निविदाही निघत नसल्याने फवारणी न करता धान्य वाचवायचे कसे असा प्रश्न संबंधित तहसिलदारांना भेडसावणे, किमान आधारभूत किंमतीच्या धान्याबाबत राज्यात सर्वत्र अशीच परिस्थिती असणे, यासंदर्भात शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(२) नगरविकास विभाग.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

(४) गृहनिर्माण विभाग.

(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सात : शासकीय विधेयके :**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

(क) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६.

(ख) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.

---

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) विधेयक, २०१६.

---

**(३) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये सभागृहाने पुन्हा संमत करणे :-**

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.

आठ : **श्री. सुनिल प्रभु, डॉ. अनिल बोंडे, श्री. सदा सरवणकर, डॉ. आशिष देशमुख, श्री. सुनिल शिंदे, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. समीर मेघे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. राज पुरोहित, सुरेश धानोरकर, अतुल भातखळकर, रमेश लटके, योगेश सागर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अशोक पाटील, सुधाकर देशमुख, तुकाराम काते, विकास कुंभारे, सुनिल राऊत, राजेंद्र पाटणी, प्रकाश फातर्पेकर, समीर कुणावार, प्रकाश सुर्वे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय पोतनीस, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुनिल देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. कृष्णा खोपडे, सुधाकर कोहळे, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. अमीत साटम, मल्लिकार्जुन रेड्डी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. सुधीर पारवे, चैनसुख संचेती, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

" विदर्भातील जलसंपदाचे अपूर्ण प्रकल्प, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यातील पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून पुरेसा निधी उपलब्ध करणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, कालव्याऐवजी पाईपलाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, पाणी वापर संस्था, उपसा सिंचन संस्था बळकट करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी

वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैणगंगा व नळगंगा जोडप्रकल्प आणि कन्हान-वर्धा बोगद्याव्दारे नदीजोड प्रकल्पाचा अभ्यास करुन ते तातडीने कार्यान्वित करणे, नागपुरातील मेट्रो रेल्वे व मिहान प्रकल्पाच्या कामातील प्रगती, विदर्भातील नगरपालिकांना हगणदारीमुक्त करणे, भुयारी गटार योजना, भूपृष्ठावरील पेयजल व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते विकास, खुल्या जागा व विकास क्षेत्रामधील जागा संरक्षित करणे, उद्यान निर्मिती व नदी परिसर यांचा विकास करुन स्मार्ट शहर करण्याकडे शासनाचा असलेला रोख, पंतप्रधान आवास योजना "ब" व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे, वन पर्यटन उद्यान, जंगल सफारी, वन संशोधन, बांबू व वन उत्पादनामधून रोजगार निर्मिती करण्यात शासनाने अग्रेसर राहणे, मुंबईतील उपकरप्राप्त व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीचे निकष सुलभ व शिथिल करण्याची आवश्यकता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करुन तेथील जमिनीचे भूसंपादन व तेथील सर्व्हे नं. २३९ वरील जमिनीची पुनर्मोजणी करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांकडून होत असलेली मागणी, आरे वसाहतीतील आदिवासी व पात्र झोपडपट्टीधारकांची समस्या व त्यांचे पुनर्वसन, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी. "

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गत सत्रात गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित राहिलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

(१) **श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स.**

"**कोकणातील सागरी पर्यटनस्थळांचा विकास करण्याबाबत**" या विषयावरील श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ५६९७२ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.**

"**पालघर जिल्ह्यातील मनोर-वाडा भिवंडी या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**" या विषयावरील श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६०३९९ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली तथापि, पुढे ढकलण्यात आलेली अर्धा तास चर्चेची सूचना) (क्रमांक ३ )**

(३) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"**शासनाने क्रीडा स्पर्धा सरावासाठी खेळाडूंना सवलत देण्याचा घेतलेला निर्णय**" या विषयावरील श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १७७ मधील प्रश्न क्रमांक ३४६८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) ( क्रमांक ४ व ५ )**

(४) **श्री. विजय काळे, वि.स.स.**

"**पुणे महानगरपालिकेमध्ये टीडीआर गैरव्यवहार झाल्याबाबत**" या विषयावरील श्री. विजय काळे, वि.स.स यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ७०१५५ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स.**

"**राज्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**" या विषयावरील श्री. हनुमंत डोळस व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६५२१२ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ९ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.